स्थायी समितीच्या **शुक्रवार दिनांक 15–05–2015** रोजी **दुपारी 12–30** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | **मा. श्री. रमेश माणिकराव सिंगारे** | **सभापती** |
| 2. | मा. श्री. शरद महादेवराव बांते | सदस्य |
| 3. | मा. श्री. संजयकुमार कृष्णराव बालपांडे | सदस्य |
| 4. | मा. श्री. श्रावण तुकाराम खापेकर | सदस्य |
| 5. | मा. श्री. गोपीचंद कृष्णराव कुमरे | सदस्य |
| 6. | मा. श्री. जगतराम सेवकराम सिन्हा | सदस्य |
| 7. | मा. श्री. मो. कामील अंसारी | सदस्य |
| 8. | मा. श्री. किशोर चिंधुजी गजभिये | सदस्य |
| 9. | मा. सौ. निता राजेंद्र ठाकरे | सदस्या |
| 10. | मा. श्री. किशोर रामाजी डोरले | सदस्य |
| 11. | मा. सौ. कांता राधेश्याम रारोकर | सदस्या |
| 12. | मा. श्रीमती प्रेरणा बळीराम कापसे | सदस्या |
| 13. | मा. सौ. सरस्वती विजय सलामे | सदस्या |
| 14. | मा. श्री. संदिप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 15. | मा. श्री. दिपक मोहन पटेल | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. सौ. विशाखा विकास मैंद | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1. श्री. श्री. आर.झेड. सिद्दीकी, उपायुक्त
2. श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

ठराव क्रमांक 47:— **नागपूर शहर मंजूर विकास आराखडया नुसार प्रभाग 36 मौजा वाठोडा येथील रोड** ( के.डी.के. कॉलेज ते वाठोडा पांदण पर्यंत 18 मीटर) रुंदीचा रस्ता विकसीत करण्याकरीता रु. 10,56,56,713/— चे ढोबळ प्राकलन प्रशासकीय मंजुरी प्रदाण करण्याचा तसेच पद . 421031370616/— अंतर्गत खर्चाची तरतुद मुक्त करण्याचा प्रश्नासह खालील बाबतीत मंजुरी प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. संबंधीत रस्ता मौजा वाठोडा खसरा क्र.27 ते 40 मिलकियत खाजगी मधून येत आहे.
2. रस्त्याचा जागेची संयुक्त मोजणी, सिमांकण व हद्द कायम करण्याकरीता नगर भुमापन अधिकारी क्र 2 नागपूर मार्फत आवश्यक फि भरुन करुन घेण्यात येईल.
3. मोजणी प्रमाणे रस्त्याकरीता आवश्यक जागा म.न.पा.ला विना मुल्या हस्तांतरीत करण्याकरीता शासन निर्णय दि. 18.09.2010 अन्वये प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी नागपूर यांना सादर करण्यात येईल.

ठराव क्रमांक 48:— प्रभाग क्र. 41 महाल येथील राजपथ चौक ते मातंगपूरा चौका पर्यंत सिमेंट कॉक्रीट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. एम.आर.ढोबळे यांची प्राकलनीय दरांपेक्षा 4.99 प्रतिशत ने कमी दरांची रू. 60,06,984/— (अक्षरी साठ लक्ष सहा हजार नऊशे चौऱ्यांशी रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 49:— प्रभाग क्र. 41 अ आणि ब महाल येथे श्री सावल यांचे घरापासून ते टिळक रोड पर्यंत सिमेंट कॉक्रींट रोडचे बांधकाम करण्याच्या कामास्तव प्राप्त 3 निविदांपैकी मे. एस.के. एन्टरप्राइझोस यांची प्राकलनीय दरांपेक्षा 8.78 प्रतिशत ने कमी दरांची रू. 27,36,190/— (अक्षरी सत्तावीस लक्ष छत्तीस हजार एकशे नव्वद रूपये) रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 50:— प्रभाग क्र. 4 ब मौजा नारी आ.क्र. एन—87, ख.क्र. 154/2, 169/14 (014) येथे जी. एम. बनातवाला इंग्रजी प्राथमिक शाळेचे बांधकाम करण्याच्या कामास्तव तयार केलेल्या रू. 2,49,72,293/— (अक्षरी दोन कोटी एकोणपन्नास लक्ष बाहत्तर हजार दोनशे त्र्यान्नव रूपये) रकमेच्या प्राकलनास पद क्र. A4502072702 व पद क्र. A47502072714 अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा तसेच मे. विस्तार आर्किटेक्ट श्री. सी.डी. गिरीपूंजे यांना प्रकल्प व्यवस्थापकीय सल्लागार म्हणून नियुक्त करून मनपाचे प्रचलित धोरणानुसार सेवाशुल्क प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 51:— रेशिमबाग येथे कविवर्य सुरेशभट सभागृहाचे उर्वरित स्थापत्य बांधकाम करण्याचे रू. 15,36,04,821/— चे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच हे काम रितसर निविदा मागवून हाती घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन 15 दिवसाची लघुनिविदा काढण्याच्या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 52:— मा. सदस्यांनी सादर केलेला खालील ठराव मा. अध्यक्ष यांनी दिलेल्या निर्देशानुसार निगम सचिव यांनी स्थायी समितीच्या सभेमध्ये वाचून दाखविला व त्यास समितीने मंजूर मंजूरच्या आवाजाने एकमताने मंजूरी प्रदान केली.

## –: ठराव :–

नागपूर शहरासाठी विकास नियंत्रण नियमावली 2000 मध्ये विद्यमान तरतुदींमध्ये पुढील दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम 1966 चे कलम 37 अन्वये फेरबदल करण्यास स्थायी समितीची ही सभा एकमताने मंजूरी प्रदान करते. तसेच सदर्हु प्रस्ताव सभागृहाच्या मान्यतेसाठी सुध्दा तातडीने सादर करण्याच्या शिफारसीसह स्थायी समितीची ही सभा मंजूरी प्रदान करते.

| अ. क्र. | नियम क्रमांक | विद्यमान तरतुद | प्रस्तावित फेरबदल |
|---|---|---|---|
| 1 | 15.4.1(c) (3) | The dividing wall between the balcony and the room may be permitted to be removed on payment of premium <u>as prescribed by the Municipal Commissioner / [Chairman, NIT] from time to time.</u> | The dividing wall between the balcony and the room may be permitted to be removed on payment of premium <u>as decided by the Standing Committee N.M.C.with the approval of the House of N.M.C./ Board of Trustee N.I.T. from time to time.</u> |
| 2 | 15.4.2(e) | Areas coverd by staircase rooms for stair flights of width 0.75 m. and above in case of row housing, pent houses and duplexes, 1.2 m. and above in case of resideneial/commercial building and 2 m. and above in case of assembly halls, area of staircase flights, midlandings and floor-landings, staircase passages irrespective of width of staircase subject to payment of premium to be decided by the <u>Municipal Commissioner / Chairman</u> and without any premium for Government, Semi-Government buildings, Educational and Hospital buildings of Charitabal Trusts and buildings constructed for slum dwellers under Slum Redevelopment Schemes. | Areas coverd by staircase rooms for stair flights of width 0.75 m. and above in case of row housing, pent houses and duplexes, 1.2 m. and above in case of resideneial/commercial building and 2 m. and above in case of assembly halls, area of staircase flights, midlandings and floor-landings, staircase passages irrespective of width of staircase subject to payment of premium to be decided by the <u>Standing Committee N.M.C.with the approval of the House of N.M.C./ Board of Trustee N.I.T. from time to time.</u> and without any premium for Government, Semi-Government buildings, Educational and Hospital buildings of Charitabal Trusts and buildings constructed for slum dwellers under Slum Redevelopment Schemes. |

| अ. क्र. | नियम क्रमांक | विद्यमान तरतुद | प्रस्तावित फेरबदल |
|---|---|---|---|
| 3 | 15.4.2(f) | Archtectural features, chimneys and elevated tanks of permissible area of fire escape stairways and lifts with cantilevered fire escape passages according to the Chief Fire Officer's requirements. Lift room, lift walls, lift lobbies subject to premium as decided by Municipal Commissioner [Chairman NIT] | Archtectural features, chimneys and elevated tanks of permissible area of fire escape stairways and lifts with cantilevered fire escape passages according to the Chief Fire Officer's requirements. Lift room, lift walls, lift lobbies subject to premium as decided by Standing Committee N.M.C.with the approval of the House of N.M.C./ Board of Trustee N.I.T. from time to time. |
| 4 | 6.5.2.3 | In specific cases, where a clearly demonstrable hardship is caused, the Commissioner/Chairman may by special written permission.<br>(i) Permit any of the dimensions/ provisions prescribeb by ............. abrogation of claim of compensation, payment of deposit and its forfeiture for noncompliance and payment of premium. | In specific cases, where a clearly demonstrable hardship is caused, the Commissioner/Chairman may by special written permission.<br>(i) Permit any of the dimensions/ provisions prescribeb by ................... abrogation of claim of compensation, payment of deposit and its forfeiture for noncompliance and payment of premium.<br>**Note:-** Premium shall be decided by Standing Committee N.M.C.with the approval of the House of N.M.C./ Board of Trustee N.I.T. from time to time. |

सुचक – हस्ता/– ॲड. संजयकुमार बालपांडे
अनुमोदक – हस्ता/– श्री. दिपक पटेल
हस्ता/– सौ. निता ठाकरे

**<u>ठराव क्रमांक 53</u> :—** आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. सभापती स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

सभापती
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर

<u><<<<<<</u>